गुणवत्ता दर्जा सुधार योजनेअंतर्गत पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्याबाबत.
(श्री.एस.डी.लोंढे,सहायक प्राध्यापक,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,चंद्रपूर)

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
*शासन निर्णय क्र.प्रतिनि-२०१०/(१४१/१०)/तांशि-१,*
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक :-२९/६/२०१०

संदर्भ:- प्र.संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे १)क्र.४/आस्था/२०१०/८७,दि.१८/२/२०१०
२)क्र.४/आस्था/पीएचडी/२०१०/५५५,दि.१५/६/२०१० चे पत्र.

**शासन निर्णय:-** श्री.एस.डी.लोंढे,सहायक प्राध्यापक,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,चंद्रपूर यांची राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान,वारंगल,आंध्रप्रदेश येथे गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत पीएच.डी.अभ्यासक्रमासाठी जुन,२०१० पासून ३ वर्ष कालावधीसाठी निवड झालेली आहे:-

२. श्री.एस.डी.लोंढे यांना संबधीत संस्थेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही या तसेच खालील नमूद अटींच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

१. प्रतिनियुक्ती पूर्ण निर्धारित कालावधीकरीता असेल.
२. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत संबधीत अध्यापकाच्या जागेवर दुस-या व्यक्तींची नियुक्ती करण्यास मान्यता असेल.
३. प्रतिनियुक्तीवरील अध्यापकास खालील अट क्र.८चे अधिन राहून त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालखंडात वेतन व भत्ते शासन अदा करील.
४. त्यांच्या वेतनाव्यतिरिक्त ज्या संस्थेत प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले,त्या संस्थेने त्यांना विद्यावेतन/ शिष्यवृत्ती दिल्यास ती स्विकारण्यास त्यांना परवानगी देण्यात यावी.
५. प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी जाण्यासाठी किवा प्रतिनियुक्तीच्या कालावधीत तसेच प्रतिनियुक्ती संपल्यावर मुख्यालयात परत येण्यासाठी त्यांना प्रवासभत्ता, दैनिक भत्ता,अनुज्ञेय राहणार नाही.
६. प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणा-या अध्यापकांना त्यांच्या उर्वरित सेवाकालावधीत कधीही अध्ययन रजा घेता येणार नाही व तसे बंधपत्र प्रशिक्षणासाठी जाण्यापूर्वी घ्यावे लागेल.
७. पी.एच.डी.साठी करारनिर्दिष्ट काळापेक्षा जास्त कालावधी वाढवून मिळण्यास उमेदवाराने अर्ज केल्यास प्रतिनियुक्तीच्या वाढलेल्या कालावधीसाठी देय व अनुज्ञेय रजा समजण्यात यावी.
८. प्रशिक्षण पूर्ण झाल्यांतर शासनाची सलग ६ वर्षे सेवा करण्याचे बंधपत्र त्यांना प्रशिक्षणासाठी द्यावे लागेल. हे बंधपत्र त्यांना शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०६८/डी-१०, १५.१०.१९६८ व शासन ज्ञापन सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०६९/डी-१०, २१.६.१९७९ मध्ये विहित केल्याप्रमाणे द्यावे लागेल.
९. संबधीत अध्यापक जर त्यांचे प्रशिक्षण अर्धवट सोडून येतील किवा जे बंधपत्राप्रमाणे शासनाची सेवा करणार नाहीत,त्यांच्याकडून शासनाने त्यांच्यावर केलेला संपूर्ण खर्च प्रचलित व्याजासह वसूल करण्यात येईल.
१०. प्रतिनियुक्तीचा कालावधी सेवाकाळ म्हणून समजण्यात यावा.
११. सदर प्रशिक्षणासाठीची प्रतिनियुक्ती त्यांच्या पेक्षा ज्येष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अगोदर पदोन्नतीसाठी आधारभूत ठरू शकणार नाही.

३. असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त अध्यापकास गुणवत्ता दर्जा सुधारणा कार्यक्रमानुसार स्नातकोत्तर (पीएच.डी.) अभ्यासक्रमासाठी पाठविण्यात आले नसते तर संबधीत अध्यापक वरील अभ्यासक्रमाच्या काळात त्याच पदावर स्थानापन्न झाले असते.

४. सदर आदेश शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.प्रतिनि २०९५/१९५५७/ (१९५/९५)/ तांशि-४, दि.२०.११.१९९६ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(वि.भा.सोनवणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

- संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.
- संबधीत संस्थाप्रमुख.
- प्रबंधक, राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान,वारंगल,आंध्रप्रदेश.
- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
- जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर.
- संबधीत अध्यापक
- निवड नस्ती/तांशि-१.